# 'जेडीआयईटी'मध्ये तीनदिवसीय वेबिनार उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयात १२ ते १४ जानेवारीदरम्यान तीनदिवसीय वेबिनार सीरिज घेण्यात आली. डेटा सायन्स, एआय, एमएल या विषयावर ही वेबिनार सीरिज पार पडली.

महाविद्यालयाच्या ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग व नागपूर येथील आयआयओटी लॅबच्या संयुक्त विद्यमाने ही वेबिनार सीरिज आयोजित केली होती. या ऑनलाइन वेबिनार सीरिजमध्ये कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग शाखेचे १८४ विद्यार्थी सहभागी झाले



होते. त्यांना आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग आणि डेटा सायन्स या आधुनिक विषयांबद्दल माहिती देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात लाभ होणार आहे.

वेबिनार सीरिजच्या उद्घाटनप्रसंगी विषयतज्ज्ञ व प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी अर्पित यादव ऑनलाइन उपस्थित होते. अर्पित यादव हे याच महाविद्यालयाचे इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग शाखेचे २००८ बॅचचे विद्यार्थी आहेत. ते आर्टिफिशिअल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग विषयाचे रीसर्चर आहेत. ते सध्या हैदराबाद येथील टेन्सरब्रीयू कंपनीत कार्यरत आहेत.

ते पायथॉन, डेटा सायन्स, मशीन लर्निंग, डीप लर्निंग आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचे कार्पोरेट ट्रेनर आहेत. नुकताच त्यांना व्हीडीगुड इन्स्पिरेशनल सायन्टिस्ट अवॉर्ड इन दि सेवन्थ इंटरनॅशनल सायन्टिस्ट अवॉर्ड ऑन इंजिनीअरिंग, सायन्स ॲण्ड मेडिसिन मिळालेला आहे. या वेबिनारचे आयोजन महाविद्यालयाचे ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मोहित पोपट यांनी केले होते.

Hello Yavatmal
Page No. 5 Jan 24, 2021
Powered by: erelego.com